# न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवडचा पाणीपुरवठा खंडित होण्याचे संकट टळले

## महापालिकेने 20 कोटी रुपये भरल्याने शहरावरील पाणी कपातीचे संकट तूर्तास टळले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरासाठी पवना धरणातून उचलण्यात येणाऱ्या पाण्याची पाणीपट्टी आणि पाणी शुद्ध करत नसल्याचा ठपका ठेवून आकारलेल्या दंडाच्या रकमेची थकबाकी न भरल्यास पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा जलसंपदा विभागाने दिल्यानंतर महापालिकेने २० कोटी रुपयांची थकबाकी शुक्रवारी (२७ मार्च) भरली. त्यामुळे तूर्तास पाणीपुरवठा खंडित होण्याचे संकट टळले आहे.



मावळातील पवना धरणातून महापालिका ५५० दशलक्ष लिटर (एमएलडी) अशुद्ध पाणी दिवसाला उचलते. या पाण्याची पाणीपट्टी जलसंपदा विभागाकडून आकारली जाते. तसेच, महापालिका पाणी शुद्ध करत नसल्याने दंडही आकारला जात आहे. पाणीपट्टी आणि २७५ एमएलडी पाण्यावर प्रक्रिया न करता पाणी नदीत सोडले जाते, याबाबतचा दंड, अशी १४३ कोटींची थकबाकी झाली होती.

ही थकबाकी भरण्याबाबत १७ मार्चला जलसंपदा विभागाने नोटीस दिल्यानंतर महापालिकेने १९ मार्च रोजी सात कोटी रुपयांचा भरणा केला. उर्वरित १३६ कोटी रुपयांची थकबाकी तातडीने भरावी, अन्यथा दोन दिवसांत पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा जलसंपदा विभागाने दिला होता. त्यानंतर शहरातील लोकप्रतिनिधींची जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याबरोबर बैठक झाली. या बैठकीत १३५ कोटी रुपयांची थकबाकी महापालिकेने भरण्याचा निर्णय झाल्याचे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार महापालिकेने शुक्रवारी २० कोटी रुपयांची थकबाकी भरली आहे. त्यामुळे तूर्त पाणीपुरवठा खंडित होण्याचे संकट टळले आहे.

### तातडीने 20 कोटींचा भरणा

**» पिंपरी चिंचवड महानगरपालिका ने पवना धरणाच्या पाणीपुरवठ्यासंदर्भातील दंडाची 20 कोटी रुपयांची थकबाकी भरली आहे. जलसंपदा विभागाच्या इशाऱ्यानंतर ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठा खंडित होण्याचे संकट सध्या टळले असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे.**

पाणीपट्टीची रक्कम थकविली जात नाही. सात कोटी रुपयांची पाणीपट्टी पूर्वीच भरली आहे. पाणी शुद्ध करत नसल्यामुळे आकारलेल्या दंडाची २० कोटी रुपयांची थकबाकी जलसंपदा विभागाकडे भरली आहे. केवळ दंडाची रक्कम थकीत असल्याने पाणीपुरवठा खंडित करता येणार नाही, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राजेंद्र मोराणकर यांनी सांगितले.

महापालिकेने १३६ कोटींपैकी २० कोटी रुपयांची थकबाकी भरली आहे. ११६ कोटी रुपयांची थकबाकी शिल्लक आहे. ही थकबाकी भरण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तूर्तास पाणीपुरवठा खंडित केला जाणार नाही, असे जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी सांगितले.

# उपजिल्हा रुग्णालयांत औषधांचा तुटवडा नको..! : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

## मावळ तालुक्यातील कान्हे आणि लोणावळा येथील उपजिल्हा रुग्णालयांची पाहणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक झाली. त्यांनी कान्हे आणि लोणावळा येथील उपजिल्हा रुग्णालयाची पाहणी केली. लोणावळा रुग्णालयातील उर्वरित काम तातडीने संपवून ते तातडीने सुरू करावे, अशा सूचना आबिटकर यांनी दिल्या.



कान्हे येथील उपजिल्हा रुग्णालयात मंत्री आबिटकर यांनी आरोग्यसेवांचा आढावा घेतला. यावेळी आमदार सुनील शेळके, उपसंचालक डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे उपस्थित होते. औषधसाठा, कर्मचारी संख्या, सोनोग्राफी यंत्रणा, आदी विषयांवर चर्चा झाली. सुविधा, वैद्यकीय यंत्रणा, औषधसाठा यांची माहिती आरोग्यमंत्र्यांनी घेतली. कान्हे येथील उपजिल्हा रुग्णालयात तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे, औषधांचा पुरवठा, अद्ययावत वैद्यकीय उपकरणे आणि आरोग्य विभागाच्या प्रलंबित विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

### रिक्त पदे, औषध पुरवठ्यावर चर्चा

**» कान्हे येथील उपजिल्हा रुग्णालयात तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे, औषधांचा पुरवठा, अद्ययावत वैद्यकीय उपकरणे आणि आरोग्य विभागाच्या प्रलंबित विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांना तातडीने उपचार मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत आमदार शेळके यांनी लक्ष वेधले. आरोग्यमंत्री आबिटकर यांनी लोणावळा उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे उर्वरित काम तातडीने संपवून अल्पावधीत रुग्णालय सुरू करण्याची सूचना केली.**

आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले, रुग्णालयातील सेवा अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण करण्यावर भर देणे आवश्यक आहे. आवश्यक त्या सुधारणा तातडीने कराव्यात. रुग्णाभिमुख सेवा, आवश्यक मनुष्यबळ उपलब्धता, औषधसाठा आणि वैद्यकीय उपकरणांच्या कार्यक्षम वापर करणे गरजेचे आहे.

# ज्येष्ठांचा अनुभव, जिद्द; भावी पिढीसाठी मार्गदर्शक : महापौर रवि लांडगे

## ज्येष्ठांची जिद्द, बालगुणवंतांचे कर्तृत्व; पिंपरी-चिंचवडचा प्रेरणादायी सन्मान सोहळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील ज्येष्ठांचा अनुभव, त्यांची जिद्द आणि समाजाशी असलेली नाळ ही आपल्या शहराची मौल्यवान ताकद आहे; तर लहान मुलांचा उत्साह, गुणवत्ता आणि नवे विक्रम घडविण्याची क्षमता हे शहराच्या उज्ज्वल भविष्याचे आश्वासन आहे. एका बाजूला आयुष्यभर शिस्त, सातत्य आणि चिकाटी जपणारे ज्येष्ठ, तर दुसऱ्या बाजूला क्रीडा, बुद्धिमत्ता आणि कौशल्याच्या जोरावर मोठी स्वप्ने साकार करणारी आपली मुले, हा पिंपरी चिंचवडचा सर्वात प्रेरणादायी चेहरा आहे. अशा व्यक्तींचा सन्मान म्हणजे केवळ त्यांच्या यशाचा गौरव नसून, संपूर्ण समाजाला प्रेरणा देणारा आणि नव्या पिढीला दिशा देणारा संदेश आहे. आपल्या शहरातील प्रत्येक गुणवंताला प्रोत्साहन देण्यासाठी महानगरपालिका नेहमीच कटिबद्ध राहील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



### बालगुणवंतांचा सन्मान

**» लॉन टेनिसमध्ये राज्यस्तरीय विजेता राम मुगदुस आणि 5 वर्षीय तेजस जोशी यांचाही गौरव करण्यात आला. तेजसने 2 मिनिटे 4 सेकंदांत 195 देशांचे झेंडे ओळखण्याचा विक्रम केला आहे. या यशामुळे शहराच्या नावलौकिकात भर पडल्याची भावना व्यक्त करण्यात आली.**

नुकत्याच झालेल्या पुणे सायकल ग्रँड टूर स्पर्धेच्या निमित्ताने चर्चेत असलेले भोसरी येथील ८४ वर्षांचे प्रसिद्ध सायकलपटू अशोक विष्णुपंत बेलापूरकर तसेच लॉन टेनिस राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणारा मनपा शाळेतील विद्यार्थी राम मुगदुस, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये २ मिनिटे ४ सेकंदात १९५ देशांचे झेंडे ओळखण्याचा विक्रम नोंदविणाऱ्या ५ वर्षीय तेजस जोशी यांचा सन्मान महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते महापालिकेच्या दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडला,त्यावेळी ते बोलत होते.

या सत्कार सोहळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे यांच्यासह उपायुक्त पंकज पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

### प्रेरणादायी सत्कार सोहळा

**» पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. महापौर रवि लांडगे यांनी ज्येष्ठांचा अनुभव आणि लहान मुलांची गुणवत्ता ही शहराची ताकद असल्याचे सांगितले. या उपक्रमातून समाजाला प्रेरणा देण्याचा उद्देश व्यक्त करण्यात आला.**

### ज्येष्ठ सायकलपटूंचा गौरव

**» भोसरी येथील 84 वर्षीय सायकलपटू अशोक बेलापूरकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांनी गेल्या अनेक वर्षांत सायकलवरून लाखो किलोमीटर प्रवास केला असून "पर्यावरण वाचवा" हा संदेश दिला आहे. त्यांच्या जिद्दीचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.**

पिंपरी चिंचवड शहराचे शिल्पकार माजी नगराध्यक्ष अण्णासाहेब मगर यांनी ३५ वर्षांपूर्वी बेलापूरकर यांची सायकलची आवड पाहून त्यांना सायकल भेट दिली होती. तीच सायकल ते आत्तापर्यंत वापरत होते सायकलवरून गेल्या ७० वर्षांत लाखो किलोमीटरचा प्रवास त्यांनी केला आहे. वारकरी असलेल्या बेलापूरकर यांनी सायकलवरून आळंदी ते पंढरपूर अशी अनेक वर्षे वारी केली आहे तसेच विविध राज्यांचा प्रवास देखील त्यांनी सायकलवर केला आहे, याशिवाय ते "सायकल चालवा -पर्यावरण वाचवा" आणि "झाडे लावा – झाडे जगवा" अशा सामाजिक कार्याचाही प्रचार करतात अशी माहिती महापौर रवि लांडगे यांनी दिली.

# पिंपरी चिंचवड शहरामध्ये होणार प्रथमच महिलांसाठी 'टी-20 क्रिकेट' स्पर्धा

## 6 एप्रिलपासून रंगणार सामने; महिला-पुरुष खेळाडूंना व्यासपीठ, आकर्षक पारितोषिकांसह रंगणार टी-20 लीग

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनतर्फे यावर्षी पुरुष व महिला खुली टी-२० प्रीमियर लीग दि.०६ एप्रिल २०२६ पासून फोरस्टार क्रिकेट मैदान फेज-३,माण येथे आयोजित करण्यात येणार असून सदर स्पर्धा उदयोन्मुख महिला व पुरुष खेळाडूंसाठी मोठी पर्वणी ठरणार आहे. ही स्पर्धा पांढऱ्या चेंडूवर होणार आहे. महिलांचे सामने २२ एप्रिल २०२६ पासून सुरू होतील तर पुरुषांचे सामने दिनांक ६ एप्रिल पासून सुरू होतील.



दि.२७ मार्च २०२६, शुक्रवार रोजी रामकृष्ण बँक्वेट हॉल, हॉटेल रामकृष्ण, रावेत येथे संसदरत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते टी-२० स्पर्धा करंडकाचे व संघांच्या टी-शर्टचे अनावरण झाले. यावेळी बोलताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या स्पर्धा नवीन उदयोन्मुख खेळाडूंना एक मोठी संधी निर्माण करतात, याचा फायदा सर्व खेळाडूंनी घ्यावा.या स्पर्धांद्वारे खेळाडूंना प्रोत्साहन मिळते व ते आपल्या खेळाचा दर्जा उंचवू शकतात. यावेळी पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश शेट्टी यांनी स्पर्धेची पूर्ण माहिती दिली.

या स्पर्धेत, महिलांच्या स्पर्धेतील विजेत्या प्रथम संघास ७५०००/- रुपये रोख व करंडक, द्वितीय संघास ५००००/- रुपये रोख व करंडक, तृतीय संघास २५०००/- रुपये रोख व करंडक तसेच उत्कृष्ट फलंदाज रुपये ५०००/- रोख व करंडक, उत्कृष्ट गोलंदाज रुपये ५०००/- रोख व करंडक, उत्कृष्ट अष्टपैलू रुपये ७०००/- व करंडक तसेच उत्कृष्ट क्षेत्ररक्षक रुपये ५०००/- व करंडक याशिवाय प्रत्येक सामन्यास प्लेयर ऑफ द मॅच व फाइटर ऑफ द मॅच ही वैयक्तिक पारितोषक देऊन सन्मानित करण्यात येईल.

यावेळी टी-२० प्रीमियर लीग (पर्व-२) नोंदणी केलेल्या एकूण ७८ महिला खेळाडू व २०३ पुरुष खेळाडू यांचे लिलाव पद्धतीने निवड करण्यात आली. पुरुष संघासाठी आठ संघमालक व संघाचे नावे पुढील प्रमाणे नरेंद्र चुरी (प्रतीक रॉयल्स), सुदाम मोरे (मोरे पाटील पँकर्स), केतुल सोनिगरा (सोनीगरासुपर किंग्स), श्री आसवानी (आसवानी डेअर डेव्हिल्स), रवी शेट्टी (शेट्टीस बंटस वॉरियर्स), विश्वजीत बारणे (विश्वा टायगर्स ), प्रेम कोकणे (स्पोर्ट्स स्टोरीज अवेंजर्स), शिवांश मानकर (सह्याद्री किंग्स) व महिला संघासाठी चार संघ मालक व संघांची नावे पुढील प्रमाणे नरेंद्र अग्रवाल (ऐश्वर्याम चॅलेंजर्स), रवी शेट्टी (शेट्टीस बंटस वॉरियर्स), हर्ष नायर (नायर ईगलस्), जानवी धारिवाल बालन (ऑक्सीरीच) आहेत. यावेळी सर्व संघमालकांचा खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी जगदीश शेट्टी (अध्यक्ष), राजू कोतवाल (सचिव), डॉ दिलीपसिंह मोहिते (सहसचिव), संजय शिंदे (खजिनदार), हर्ष नायर, विजय कोतवाल, नरेंद्र कदम, मुकेश गुजराथी, प्रदीप वाघ, अरुण जागडे, प्रशांत तेलंगे, अमित कदम, डॉ मृदुला महाजन, सुशील जाधव, ऐश्वर्या साठे उपस्थित होते.

# पाणी सोडणाऱ्या 'व्हॉल्व्हमन'कडे प्रमाणपत्र आवश्यक !

## पुण्यात पाणी सोडणाऱ्या 'व्हॉल्व्हमन'ला आता प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र अनिवार्य; स्थायी समितीचा मोठा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांत पाणी सोडण्याचे काम करणाऱ्या 'व्हॉल्व्हमन'ना यापुढे प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र जवळ ठेवावे लागणार आहे. पाणी सोडण्याच्या कामाची आवश्यक ती तांत्रिक माहिती असलेल्या व्यक्तीलाच हे काम दिले जावे हा यामागे उद्देश आहे. स्थायी समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पाणी सोडण्याचे काम करणाऱ्या 'व्हॉल्व्हमन' बाबत आलेल्या तक्रारींवर महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. व्हॉल्व्हमन म्हणून काम करणाऱ्यांकडे प्रमाणपत्र असल्याशिवाय त्यांना हे काम देण्यात येऊ नये, असे आदेश स्थायी समितीच्या बैठकीत महापालिका प्रशासनाला देण्यात आले आहेत, अशी माहिती समितीचे अध्यक्ष भिमाले यांनी दिली.

पाणी सोडण्यासाठी व्हॉल्व्हमन ठेकेदारांकडून घेतले जातात. यासाठी निविदा प्रक्रिया राबविली जाते. पाणी सोडण्याचे काम करणाऱ्या व्हॉल्व्हमनसाठी महापालिका दीड ते दोन कोटी रुपयांची निविदा काढते. त्यानंतर त्यांची नियुक्ती होते. मात्र, आता त्यांच्याकडे व्हॉल्व्हमनचे प्रमाणपत्र असल्याशिवाय त्यांना काम मिळणार नाही. तसेच, ज्यांच्याकडे हे प्रमाणपत्र नसेल अशा ठेकेदाराला त्याच्या कामाचे बिल देण्यात येऊ नये, असे आदेश प्रशासनाला दिल्याचे भिमाले यांनी सांगितले.

पाण्याची वाढत असलेली मागणी आणि पाणी सोडताना 'व्हॉल्व्हमन' कडून होणारा मनमानी कारभार थांबविण्यासाठी स्थायी समितीने हे पाऊल उचलले आहे. महापालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेतही अनेक सभासदांनी व्हॉल्व्हमन म्हणून काम करणाऱ्यांची मुजोरी किती असते, याचे दाखले सभागृहात देऊन त्यांना बदलण्याची मागणी केली होती. सकाळी केवळ दोन तास पाणी सोडण्याचे काम केल्यानंतर दिवसभर इतर कामे व्हॉल्व्हमन म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती सर्रास करतात. दोन तासांचे २० ते २५ हजार रुपयांचे वेतन त्यांना मिळते. तसेच, काही भागांतील नागरिकांकडून पैशांची मागणी देखील त्यांच्याकडून केली जात असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे केल्या जात होत्या.

स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले म्हणाले, शहरातील विविध भागांत पाणी सोडण्यासाठी नियुक्त केल्या जाणारे व्हॉल्व्हमन तांत्रिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. त्यांना प्रमाणपत्राचे बंधन घालण्यात आले आहे. प्रमाणपत्र नसेल, तर संबंधित ठेकेदाराला बिल दिले जाणार नाही.




### मनमानीवर लगाम

» व्हॉल्व्हमनकडून नागरिकांकडून पैसे उकळणे, कमी वेळ काम करून जास्त मानधन घेणे अशा तक्रारी वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिकेने हा निर्णय घेतला आहे. तांत्रिकदृष्ट्या सक्षम व जबाबदार व्यक्तींमार्फत पाणी वितरण करून नागरिकांना अधिक चांगली सेवा देण्याचा उद्देश प्रशासनाचा आहे.

### प्रमाणपत्र बंधनकारक

» पुण्यात पुणे महानगरपालिका हद्दीत पाणी सोडणाऱ्या 'व्हॉल्व्हमन'ना प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी ही माहिती दिली. तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्तींनाच हे काम देण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे पाणी वितरण अधिक शिस्तबद्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### बिल देण्यावर निर्बंध

» प्रमाणपत्र नसलेल्या व्हॉल्व्हमनकडून काम करून घेतल्यास संबंधित ठेकेदाराला बिल अदा केले जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. निविदा प्रक्रियेतही बदल करून प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयनिहाय व्हॉल्व्हमन नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे कामावर अधिक नियंत्रण ठेवता येणार आहे.

# पुणे गाडीखाना दवाखान्यासाठी 97.96 लाखांच्या कामांना मंजुरी

## कसबा मतदारसंघातील दवाखान्यात विकासकामे; नागरिकांसाठी आरोग्य सुविधा अधिक सक्षम होणार

**पुणे | प्रतिनिधी**

कसबा मतदारसंघातील गाडीखाना दवाखान्यात विविध विकासकामे करण्यासाठी सुमारे 97.96 लाख रुपयांच्या निविदेला महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे

याबाबतची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. या कामाचा प्रस्ताव महापालिकेच्या भवन विभागामार्फत सादर करण्यात आला होता. संबंधित कामासाठी सर्वांत कमी दर देणाऱ्या ठेकेदाराची निवड करण्यात आली असून, त्यांच्या निविदेनुसार 2 टक्के कमी दरात काम करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने मांडला होता.

या प्रकल्पाच्या एकूण खर्चात जीएसटी, रॉयल्टी, तसेच मटेरिअल टेस्टिंग शुल्काचा समावेश असून, अंतिम खर्च सुमारे 97.96 लाख रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. मात्र, चालू आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात या कामासाठी सुमारे 95.20 लाख रुपयांचीच तरतूद उपलब्ध आहे. त्यामुळे उपलब्ध निधीनुसार टप्प्या-टप्प्याने काम पूर्ण केले जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, या कामासाठी डिपॉझिट फंडाचा वापर न करता महापालिकेच्या नियमित अर्थसंकल्पीय तरतुदीतूनच खर्च भागविण्यात येणार आहे. स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर ठेकेदारासोबत करारनामा करून प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात होणार आहे.

कसबा मतदारसंघातील गाडीखाना दवाखान्यात विविध विकासकामे करण्यासाठी सुमारे 97.96 लाख रुपयांच्या निविदेला महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे शहरातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने गाडीखाना दवाखान्यातील ही विकासकामे महत्त्वाची ठरणार आहेत. या कामांमुळे दवाखान्याची पायाभूत सुविधा सुधारून नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.




### दवाखान्याच्या विकासकामांना मंजुरी

» पुणे महानगरपालिका स्थायी समितीने कसबा मतदारसंघातील गाडीखाना दवाखान्यासाठी सुमारे 97.96 लाख रुपयांच्या विकासकामांना मंजुरी दिली आहे. ही माहिती समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. निविदा प्रक्रियेत सर्वात कमी दर देणाऱ्या ठेकेदाराची निवड करण्यात आली असून, उपलब्ध निधीनुसार कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाणार आहेत. या प्रकल्पामुळे दवाखान्याच्या पायाभूत सुविधा सुधारून नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सेवा मिळण्याची अपेक्षा आहे.

# पुढच्या 10 वर्षांत शहराचा चेहरामोहरा बदलणार : विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार

## मिसिंग लिंक्स जोडण्यापासून ते ई-चलन वसुलीपर्यंत; विभागीय आयुक्त यांचे सर्व विभागांना नियोजनाचे आदेश.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील वाहतूक नियोजन व नियंत्रणासाठी सर्व विभागांनी सूक्ष्म तपशील लक्षात घेऊन पुढील १० वर्षांचे नियोजन करावे. मुख्य रस्त्यांवरील मिसिंग लिंक, बॉटलनेक काढणे, रस्ता रुंदीकरण, फुटपाथ व पायाभूत सुविधांसह संपूर्ण कॉरिडॉरच्या सुधारणा करण्यासाठी प्राधान्याने करावयाच्या येणाऱ्या कामांची यादी पुणे महानगरपालिकेने तयार करावी, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार दिल्या.



### 10 वर्षांचा वाहतूक आराखडा

» पुणे शहरातील वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी पुणे महानगरपालिका यांनी पुढील 10 वर्षांचा सविस्तर आराखडा तयार करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या. मिसिंग लिंक पूर्ण करणे, बॉटलनेक हटविणे, रस्ते रुंदीकरण आणि पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे.

पुणे शहर वाहतूक व्यवस्थापन आराखडा बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, अतिरिक पोलीस आयुक्त मनोज पाटील आदी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले की, वाहतूक नियमनासाठी राबविण्यात येणारे प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी आपापसात समन्वय ठेवावा. पथारी विक्रेत्यांचे क्षेत्र निश्चित करावेत, कार्यक्षेत्रानुसार काम करणाऱ्या संस्थांची निवड करावी, कामांची यादी तयार करुन कृती आराखडा तयार करावा, असे हर्डीकर यांनी सांगितले.

बैठकीत शहरातील ९० मुख्य चौकांमध्ये रस्ता रुंदीकरण, फेरीवाल्यांना सार्वजनिक सुविधा जागांमध्ये जागा देणे, पथदिवे बसविणे, बिनधनी वाहनांकरिता जागेची उपलब्धता, तंत्रज्ञान आधारित वाहतूक नियोजन, प्रलंबित इ-चलन, वाहतूक सल्लागार नेमणे, वाहतूक पोलिसांचे मनुष्यबळ वाढविणे आदी विषयांचा आढावा घेण्यात आला पुणे शहरातील वाहतूक नियोजन व नियंत्रणासाठी सर्व विभागांनी सूक्ष्म तपशील लक्षात घेऊन पुढील १० वर्षांचे नियोजन करावे. मुख्य रस्त्यांवरील मिसिंग लिंक, बॉटलनेक काढणे, रस्ता रुंदीकरण, फुटपाथ व पायाभूत सुविधांसह संपूर्ण कॉरिडॉरच्या सुधारणा करण्यासाठी प्राधान्याने करावयाच्या येणाऱ्या कामांची यादी पुणे महानगरपालिकेने तयार करावी, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार दिल्या.

### समन्वयावर भर

» बैठकीत महा मेट्रो, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पोलीस आणि इतर विभागांच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. प्रलंबित प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वय ठेवून काम करावे, तसेच पथारी विक्रेत्यांसाठी नियोजित जागा निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### 90 चौकांवर सुधारणा

» शहरातील 90 प्रमुख चौकांमध्ये सुधारणा, पथदिवे, पार्किंग व्यवस्था, तंत्रज्ञानाधारित वाहतूक नियंत्रण, प्रलंबित ई-चलन वसुली आणि वाहतूक पोलिसांचे मनुष्यबळ वाढविणे यावर भर देण्यात आला. नागरिकांना सुकर व सुरक्षित प्रवासासाठी व्यापक उपाययोजना राबविण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

---

# निरा खोऱ्यात धरणे तुडुंब; उन्हाळ्यातही शेतीला पाण्याची चिंता नाही

## 55% पेक्षा अधिक पाणीसाठ्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा; कालव्यांतून विसर्ग सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

निरा खोऱ्यातील गुंजवणी, भाटघर, निरा देवधर आणि वीर या धरणातून सतत कमी-जास्त प्रमाणात विसर्ग सुरू असून, वीर धरणाच्या पाणी पातळीत समाधानकारक वाढ झाली आहे. त्यामुळे निरा खोऱ्यातील शेतकऱ्यांना येणाऱ्या ऐन उन्हाळ्यात शेतीला व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावणार नसल्यामुळे शेतकरी वर्ग समाधान व्यक्त करत आहे



निरा खोऱ्यातील धरणांमध्ये सध्या सरासरी 55.76 टक्के पाणीसाठा शिल्लक असल्यामुळे शेतकरी वर्गाला उन्हाळी पिके घेण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. जिल्ह्यातील पुरंदर, बारामती, इंदापूर तसेच सातारा जिल्ह्यातील खंडाळा, फलटण व पुढे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जीवनदायनी असलेल्या निरा नदीवरील गुंजवणी, भाटघर, निरा देवधर व वीर धरणाचा खूप मोठा आधार राहिलेला आहे. याच धरणातील पाण्यावर अनेक शेतकऱ्यांनी बाराही महिने तरकारी पिके तसेच फळबागा घेऊन आपली उन्नती साधली आहे.

गुरुवारी (दि. 26) या धरणांमध्ये 55.76 टक्के पाणीसाठा होता. 48 टीएमसी क्षमता असलेल्या भाटघर, निरा देवधर, वीर आणि गुंजवणी या चार धरणात सध्या 27.114 टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी आजच्या तारखेला या चार धरणात 19 टीएमसी म्हणजे 40 टक्के पाणीसाठा होता. परंतु, यावर्षी पाणी मुबलक प्रमाणात असल्यामुळे निरा खोऱ्यातील शेतकऱ्यांना उन्हाळ्यात देखील शेतीला व पिण्याचे पाणी पुरेल इतका समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध आहे.

या धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा असल्यामुळे निरा खोऱ्यातील ऊस उत्पादक शेतकरयांना वेळच्या वेळी उसाच्या शेतीला पाणी मिळण्याच्या आशा निर्माण झाल्या आहेत. यावर्षी गहू, हरभरा व इतर कडधान्यांना चांगला उतार आला आहे. या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तरकारी पिकांबरोबर फळबागही हिरव्यागार दिसत आहेत. काढणी झालेल्या शेतात अनेक शेतकऱ्यांनी चारा पिकांचे उत्पादन घेतले आहे. त्यामध्ये कडवळ, मका, घास ही पिके शेतकऱ्यांनी घेतली आहेत. त्यामुळे ऐन उन्हाळ्यातही जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा प्रश्नमार्गी लागलेला आहे.

> वीर धरणातून निरा डावा कालव्यात 827 क्युसेकने विसर्ग चालू आहे. निरा उजवा कालवा 1 हजार 550 क्यूसेकने सुरू आहे. त्यामुळे नदीकाठचा व कालव्यावर शेती अवलंबून असलेला शेतकऱ्यांची सिंचनाचे अडचण दूर होणार आहे.
>
> - संभाजी शेडगे, कर्मचारी, धरण प्रशासन